ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 3.612(IIJIF)
UGC

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 3 NO. 6 Nov. 2017

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**

On the Occasion of
UGC Sponsored One Day National Seminar On

## IMPACT OF GLOBALIZATION ON RURAL INDIA

21st November, 2017



*Guest Editors*

**Dr. Subhash K. Pawar**
**Mr. Vikas T. Adlok**

ORGANIZED BY
DEPARTMENT OF SOCIOLOGY
LATE DATTATRAYA PUSADKAR ARTS COLLEGE
NANDGAON PETH, TQ. DIST. AMRAVATI (M.S.)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

Vol. 3 No. 6 Nov. 2017

(UGC Approved Journal No. 63716)

Impact Factor: 3.012 (IIJIF)

## SPECIAL ISSUE

UGC Sponsored One Day National Seminar On

## Impact of Globalization on Rural India

21st November, 2017

*Organized by*

DEPARTMENT OF SOCIOLOGY
LATE DATTATRAYA PUSADKAR ARTS COLLEGE,
NANDGAON PETH, TQ. DIST. AMRAVATI.
*(Accredited B Grade by NAAC)*

*Guest Editors*

**Dr. Subhash K. Pawar**
**Mr. Vikas T. Adlok**

MGEW SOCIETY'S
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES
KALYAN (MAHARASHTRA)
Contact: +91 9730721393 +91 8329000732 chcskalyan@gmail.com

| S. No. | Title of Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Impact Of Globalization On Health And Environment. | Prof. Kulkarni Girirao | 10 |
| 2 | Impact Of Globlization On The Changing Social And Economic Status Of Indian Rural Women | Anjali R. Wath | 13 |
| 3 | The Changing Role Concept Of Women In The Globalization | Dr.C.D. Kamble | 16 |
| 4 | Impact Of Globalization On Health And Environment | Prof. Sandeep Gore | 18 |
| 5 | Impact Of Globlization In Rural India | Sandeep M. Hadole | 21 |
| 6 | Impact Of Globoliastion On Small Skell Industries In India | Dr. Anurath Chandre | 24 |
| 7 | Globalization And Its Impact On Small Scale Industries In India | Dr. Anil K. Thakre | 28 |
| 8 | Impact Of Globalization On Indian Writing In English | S. P. Kamble | 31 |
| 9 | The Study Of Agricultural Productivity In India And State Of Maharashtra | Mr. Hari Pandhari Wangarwar, | 33 |
| 10 | Globalisation And Its Impact On Agricultural Sector Of India | Devedndra K. Bhawari | 37 |
| 11 | Impact Of Globalization On Health Sector In The Context Of Rural Indian | Dr. Siddharth Gangale | 39 |
| 12 | Globalization Vs Localization – A Search For An Alternative Path | Dr.K.B.Nayak | 42 |
| 13 | Impact Of Globalization On Health And Environment | Dr. R. B Waware, Swapnil Waware | 47 |
| 14 | Effects Of Globalization On Indian Rural Society And Family | Dr. A. D. Chauhan & Dr. Swati Girase | 50 |
| 15 | Impact Of Globalization On Rural Social Life | Prof. Eshwar L. Rathod | 54 |
| 16 | The Situation, Problems Of Indian Rural Women Within The Globalization: An Overview | Dr. Ramesh D. Rathod | 58 |
| 17 | Globalization & Rural And Social Insurance Issues In India | Dr Acharya R. D. | 61 |
| 18 | Impact Of Globalization On Education In India | Dr. S.S. Mahulkar | 64 |
| 19 | A Study On The Impact Of Globalization On Indian Society | Dr. Khushal J.Alaspure | 67 |
| 20 | Globaliation And Indian Educaton | Dr. Anil P. Jain | 69 |
| 21 | Impact Of Globalization On Rural Social Life | Bandu U. Jamnik | 73 |
| 22 | New Issues And Strategies Of Rural Marketing In The Changing Scenario With Indian Prespective | Dr. Mangesh Ramesh Bhavsar | 76 |

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | जागतिकीकरणाचा ग्रामिण समुदायावरील प्रभाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. सविता महाजन | 160 |
| 20 | जागतिकीकरणाचा ग्रामिण समाजावरील प्रभाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. जयश्री घुगे | 164 |
| 21 | ग्रामीण समाजजीवनावर जागतिकीकरणाचा प्रभाव | प्रा. सागर बडगे | 168 |
| 22 | जागितिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम | डॉ. विजय नागरे | 172 |
| 23 | जागितिकीकरणाचा कृषी क्षेत्रावर पडलेला प्रभाव | प्रा. होमराज टी. रोठाड | 176 |
| 24 | जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण सामाजिक जीवनावरील प्रभाव | प्रा. प्रदिप ल.अंबोरे | 180 |
| 25 | **जागतिकीकरणाचा भारतीय शेती व्यवसायावर परिणाम** | **डॉ. श्रीनिवास पिलगुलवार** | 18 |
| 26 | जागतीकीकरणाचा ग्रामीण भारतावरील परिणाम | प्रा. अस्मिता आर. दोंबरे | 188 |
| 27 | जागतिकीकरणाचे ग्रामीण समाज संरचनेवर होणाऱ्या परिणामाचे समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ.सुधा मु. खडके (कडू) | 19 |
| 28 | जागतिकीकरण आणि जागतिक श्रमशक्ती | डॉ. स्वराली चं. कुलकर्णी | 196 |
| 29 | जागतिकरणाचा भारतीय शेतीवर प्रभाव | प्रा. मनोहर रा. चौधरी | 200 |
| 30 | जागतिकीकरण आणि ग्रामिण समाज | डॉ. बि. पि.उबाळे | 204 |
| 31 | जागतीकिकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावरील परीणाम | प्रा.अनिल बि.वानखडे | 20 |
| 32 | जागतिकीकरण आणि ग्रामीण जीवनावर प्रभाव | प्रा. दामोदर दुधे | 209 |
| 33 | जागतिकीकरण व भारतीय शेतीवरील परिणाम | प्रा.सुजाता आर.नाईक (गवई) | 21 |
| 34 | जागतिकीकरणाचा ग्रामीण व आदिवासी कामगारावरील परिणाम : समाजशास्त्रीय अध्ययनाचा नवा संदर्भ | डॉ. आनंद बनकर | 21 |
| 35 | जागतिकीकरणाचा भारतावरील प्रभाव - एक विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा. अमरिष एस. गावंडे | 22 |
| 36 | जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परीणाम | डॉ. सचिन ज. होले, डॉ. एस. एस. सोमवंशी | 22 |
| 37 | जागतिकीकरण आणि ग्रामीण स्त्री | प्रा. पुरुषोत्तम आर. बांडे | 22 |
| 38 | **जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम** | **प्रा. नंदकिशोर उ.राऊत** | 23 |
| 39 | जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव ... | डॉ. छाया नेम्मानीवार | 23 |
| 40 | जागतिकीकरण – ग्रामीण समाज जीवन | प्रा. दिपक सां.देशमाने | 24 |
| 41 | पर्यावरण-हास व मानवी आरोग्य : एक ज्वलंत समस्या | प्रा. राजेश पां. मेश्राम | 24 |
| 42 | जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर पडलेला प्रभाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ.बी.एच.किर्दक | 24 |
| 43 | जागतिकीकरणाचे सामाजिक, व्यवसायिक व राजकीय घटकांना प्रभावीत करणारे घटक | प्रा. राजेश ब्राम्हणे | 24 |
| 44 | जागतिकीकरणाचा ग्रामीण भागावर झालेल्या परिणामाचे अध्ययन | डॉ. विशाखा जगन्नाथ डेरे | 25 |

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

43.

# जागतिकीकरणाचे सामाजिक, व्यवसायिक व राजकीय घटकांना प्रभावीत करणारे घटक

प्रा. राजेश ब्राम्हणे
स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगांव पेठ, अमरावती.

**प्रास्ताविक :**

जागतिकीकरण आणि उदारीकरण या प्रक्रियाची चर्चा चांगल्या आणि वाईट अर्थाने सर्वत्र होताना दिसते. शीत युद्धोत्तर काळात निर्माण झालेल्या नवीन विश्वरचनेमध्ये या दोन्ही प्रक्रियांचा प्रभाव वाढला असुन त्या अपरिहार्य बनल्या आहेत. विशेष म्हणजे या दोन्ही प्रक्रिया सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनाला प्रभावित करत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपासून आज कोणतेही राष्ट्र अलिप्त राहू शकत नाही. इच्छा असो अथवा नसो, पण आज प्रत्येक राष्ट्र जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये ओढले गेले आहे. आर्थिक उदारीकरण हे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील साधन आहे. आर्थिक उदारीकरणाच्या साधनाद्वारे राष्ट्रीय अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी जोडण्याचा प्रयत्न राष्ट्रांकडून होतो आहे. आज बहुतांश अविकसित, गरीब, विकसनशील राष्ट्रांनी आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्विकारलेला दिसतो. विश्व बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या आंतरराष्ट्रीय संस्था आर्थिक उदारीकरणासाठी राष्ट्रांवर दबाव आणत आहेत. काही राष्ट्रे या प्रक्रियांकडे आर्थिक आणि व्यापारी विकासाची गुरूकिल्ली म्हणून पाहत आहेत. त्यांना ही नववसाहतवादाची साधने वाटतात आणि त्यामुळे आर्थिक आणि राजकिय सार्वभौमत्व गमवावे लागेल, अशी भीती त्यांना आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये जागतिकीकरण आणि उदारीकरण या दोन्ही संकल्पना, प्रक्रियांचा अर्थ, स्वरूप, वैशिष्ट्ये, फायदे-तोटे यांची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. त्यामुळे या संकल्पना समजावून घेणे सोपे जाणार आहे.

**१) जागतिकीकरण : अर्थ आणि स्वरूप :**

**अ) उत्पादने, सेवा, भांडवल आदींच्या सीमापार प्रवाहाला दर्शविणारी प्रक्रिया :**

जागतिकीकरणाच्या संकल्पनेच्या निश्चित अर्थ स्पष्ट करणे अवघड आहे. अनेक विचारवंतानी या संकल्पनेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे, पण त्यातून या संकल्पनेचे निश्चित स्वरूप नष्ट होत नाही. सर्वसाधारणपणे जागतिकीकरण ही उत्पादने (Product) सेवा (Service), भांडवल (Capital), लोक (People), माहिती आणि संस्कृती (Information and culture), यांच्या सीमापार ( Cross Border), वाढत्या प्रवाहाला दर्शविणारी संकल्पना आहे.

**ब) एकीकरणाची प्रक्रिया :**

काही अभ्यासक जागतिकीकरणाला वैश्विक पातळीवर होत असलेली राजकिय, आर्थिक आणि सांस्कृतिक एकीकरणाची ( Integration) प्रक्रिया दर्शविणारी संकल्पना मानतात. काहींच्या मते जागतिकीकरण मुक्त व्यापार आणि मुक्त बाजारपेठांच्या माध्यमातून वैश्विक एकीकरण साधणारी प्रक्रिया आहे.

**क) राज्यकांचे महत्व वाढविणारी प्रक्रिया :**

राजकिय दृष्टिकोनातून काही अभ्यासकांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांचे पारंपारीक महत्व कमी करून बहुराष्ट्रीय कंपन्या आणि आंतरराष्ट्रीय संस्था, संघटनाचे राज्यकांचे (Non State Actors) महत्व वाढविणारी प्रक्रिया म्हणून जागतिकीकरणाचा उल्लेख केला आहे.. या प्रक्रियेगुळे राष्ट्रांच्या आर्थिक आणि राजकिय सार्वभौमत्वाची (Economic & Political Sovereignty of the Nation State) संकल्पना मागे पडली असून त्याची जागा पडली असून त्याची जागा विभागीय तसेच आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि राजकिय सार्वभौमत्वाने घेतली आहे, असा विचार देखील काही अभ्यासकांकडून मांडला जातो.

**२) जागतिकीकीकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये :** जागतिकीकरण संकल्पनेच्या विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांवरून या संकल्पनेची काही वैशिष्ट्ये सांगता येतील. ती खालील प्रमाणे आहेत -

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

१) आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रिया -

जागतिकीकरण ही विविध पातळ्यांवर लोकांमधील राष्ट्रांमधील संबंध, क्रिया- प्रतिक्रीया (Interaction) वाढविणारी प्रक्रिया (Process) आहे. सन १९९० च्या दशकात या प्रक्रियेने वेग पकडला असून आंतराष्ट्रीय पातळीवर सहकार्य वाढल्याचे चित्र दिसत आहे. शीतयुद्धाचा शेवट, आर्थिक संबंधाना प्राप्त झालेले प्राधान्य, माहिती तंत्रज्ञ ानाच्या क्षेत्रात घडून आलेली क्रांती, विश्व व्यापार संघटना तसेच विविध व्यापार संघाची झालेली निर्मिती यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग प्राप्त झाला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रवास एका विश्व संस्कृतीच्या तसेच विश्व संस्कृतीच्या तसेच विश्व आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेच्या निर्मितीच्या दिशेने होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे लोकांमधील अंतर कमी होत असून Global village ची कल्पना आकाराला येत आहे.

२) मुक्त व्यापाराचा पुरस्कार :

जागतिकीकरणाची प्रक्रिया मुक्त विश्व व्यवस्थेच्या निर्मितीशी संबंधीत आहे. मुक्त व्यापार आणि मुक्त बाजारपेठेच्या माध्यमातुने अशी व्यवस्था आकाराला येईल. ही स्वातंत्र्यावर आधारीत व्यवस्था आहे. जगातील सर्व लोकांना अशा व्यवस्थेचा फायदा घेता येईल. लोकांमधील वाढत्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंधामधून, सहकार्यामधून अशा व्यवस्थेची निर्मिती शक्य आहे. या व्यवस्थेमध्ये जगातील सर्व लोकांचे आर्थिक आणि सामाजिक एकीकरण होईल. ही व्यवस्था आर्थिक तसेच राजकिय स्वरूपाची असेल.

३) बहुराष्ट्रीय कंपन्यांची प्रभावी भुमिका :

जागतिकरीकरणाच्या प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्यांची भुमिका आणि प्रभाव मोठा आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि राजकिय व्यवस्थेतील निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकणारे हे घटक आहेत. या कंपन्यांचे बहुराष्ट्रीय स्वरूप, त्यांच्या कामाची व्याप्ती, त्यांचे भांडवल, त्यांच्या वाढत्या प्रभावाला जबाबदार आहेत. काही अभ्यासक या बहुराष्ट्रीय कंपन्याना भांडवली अर्थव्यवस्थेची निर्मिती मानतात. भांडवलशाहीच्या जागतिक प्रसारात अशा कंपन्यांची भूमिका महत्वाची आहे. शोषणावर आधारित नववसाहतवादी व्यवस्थेत भांडवलशाही राष्ट्र अशा कंपन्यांना शोषणाचे साधन म्हणून वापर करून घेतात.

४) विभागीय व्यापार संघाची महत्वाची भुमिका :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विभागीय व्यापारी आणि आर्थिक संघटनांची भुमिका वाढली. व्यापारी आणि आर्थिक पातळीवर विभागीय एकीकरणात ( Regional Integration ) या व्यापार संघाचे योगदान महत्वाचे आहे. या व्यापार संघाचे योगदान महत्वाचे आहे. या व्यापार संघानी शीतयुद्ध कालीन लष्करी संघटनांची जागा घेतली आणि विभागीय आर्थिक व्यापारी हितसंबंधाच्या (Regional Economics Interests) संरक्षणासाठी संघटीत प्रयत्न सुरू झाले. या व्यापारसंघामध्ये आसियान (Association of South East Asian Nations- ASEAN) ओक ( Asia pacific Economic Co- operation) नाफ्ता ( North American Free Trade Agreement- NAFTA) युरोपीयन महासंघ ( European Union) सार्क ( South Asian Association for Regional Co-operation - SAARC ) हे व्यापार संघ महत्वाचे असून या व्यापारसंघाची आपण थोडक्यात ओळख करून घेऊ.

३) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेवर प्रभाव पाडणारे प्रमुख व्यापार संघ :

अ) आसियान (Association of South East Asian Nations- ASEAN)

दक्षिणपूर्वी आशियायी राष्ट्रांची सहकार्य संघटना म्हणजे आसियानाची स्थापना सन १९६७ झाली झाली. आसियानाच्या स्थापनेमागचा मुख्य उद्देश दक्षिणपुर्व आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करणे, आर्थिक सहकार्यासाठी संघटीत प्रयत्न करणे हा आहे. आसियानची सदस्यसंख्या दहा असुन त्यात थायलंड, मलेशिया, सिंगापुर,फिलीपाईन्स, इंडोनेशिया, ब्रुनेई, व्हिएतनाम, कंबोडीया लाओस या देशांचा समावेश होतो. आर्थिक सहकार्याबरोबरच विभागीय संरक्षणाच्या मुद्यावर चर्चा करण्यासाठी आसियानाच्या अंतर्गत आसियाना रिजनल फोरम (ASEAN Regionals Forum ARF) नावाचे एक व्यासपीठ तयार करण्यात आले आहे. या फोरमची सदस्यसंख्या १८ असून भारतदेखील या फोरमचा सदस्य आहे. आसियाना मुक्त व्यापार क्षेत्राची (ASEAN Free Trade Area- AFTA) निर्मिती सन २००५ पर्यंत करण्यात येणार आहे. दक्षिणपूर्व आशियाची राष्ट्रांच्या आर्थिक

आणि औद्योगिक विकासात आसियान संघटनेचा वाटा महत्वाचा आहे. या राष्ट्रांच्या आर्थिक विकासाचा दर ७ ते ८ टक्के एवढा असून ते आशियाई वाघ (Asian Tigers) म्हणून ओळखले जातात.

**ब) एपेक ( Asia Pacific Economic Co-operation- APEC) :**

एपेक हा जगातील श्रीमंत राष्ट्रांचा व्यापारसंघ म्हणून ओळखला जातो. सन १९८९ साली एपेक संघटनेची स्थापना झाली. एपेकमध्ये अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जपान,दक्षिण कोरीया, न्युझीलंड, मलेशिया, थायलंड, सिंगापुर, कॅनडा, जपान, फिलीपाईन्स, इंडोनेशिया, ब्रुनोई, चीन, हाँगकाँग, तैवान, मेक्सिको, पपूआन्युगिनिया आणि चिली या राष्ट्रांचा समावेश होतो. एपेकच्या सदस्यांमध्ये विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांचा समावेश होतो. एपेकचा प्रवास आसियान संघटनेप्रमाणेच मुक्त व्यापारक्षेत्राच्या निर्मितीच्या दिशेने होत आहे. विकसित राष्ट्रांसाठी मुक्त व्यापार आणि गुंतवणुकीची मुदत सन २०१० तर विकसनशील राष्ट्रांसाठी सन २०२० ठेवण्यात आली आहे. मुक्त व्यापार आणि गुंतवणूक क्षेत्र निर्मितीचा एपेकचा हा प्रस्ताव 'मनिला कृती योजना (Manila Action Plan)' म्हणून ओळखला जातो.

**४) जागतिकीकरण - टिकात्मक परीक्षण :**

जागतिकीकरणाची प्रक्रिया ही जरी न टाळता येणारी आणि अतिशय वेगाने प्रसिद्ध पावत असलेली प्रक्रिया असली तरी या प्रक्रियेवर टीका करणारा एक वर्ग आहे. त्यांचे विचार खालील प्रमाणे सांगता येतील.

१) भांडवलशाहीला अनुकूल प्रक्रिया
२) शोषणावर आधारित प्रक्रिया
३) नववसाहतवादाचे साधन :
४) जागतिकीकरणाचे नकारात्मक परीणाम :
५) लोकशाहीविरोधी प्रक्रिया
६) बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी
७) राष्ट्रीय सार्वभौमत्वाला आव्हान

**निष्कर्ष :**

जागतिकी करण ही उत्पादने, सेवा, भांडवल, लोक, माहिती आणि संस्कृती यांच्या सीमापार वाढत्या प्रवाहाला दर्शविणारी प्रक्रिया आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया आज अपरिहार्य प्रक्रिया बनली असून त्यापासून अलिप्त राहणे कोणत्याही राष्ट्राला शक्य नाही.

जागतिकीकरण ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रिया-प्रतिक्रिया वाढवणारी, मुक्त व्यापाराचा पुरस्कार करणारी, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भुमिकेला चालना देणारी, विभागीय व्यापारसंघ आणि बिगर शासकीय संघटनांची भूमिका वाढली आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आसियान, नाफ्टा, युरोपियन महासंघ, सार्क, एपेक यासारख्या व्यापारसंघाची भूमिका वाढली आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमधे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या व्यवस्थापनासाठी व्यापार राजवटींचा उदय झाला आहे.

विश्व व्यापार संघटना ही आंतरराष्ट्रीय व्यापार राजवटींचा उत्कृष्ट नमुना आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे राष्ट्रीय सार्वभौमत्वावर नकारात्मक परिणाम होत असल्याचा आरोप अनेकांकडून होतो. जागतिकीकरणामुळे सार्वभौमत्वाचे विभाजन होऊन सार्वभौमत्वाचे प्राधिकार आणि स्वायत्तता धोक्यात आली असल्याचे मत काही अभ्यासक व्यक्त करतात.

जागतिककरणाच्या प्रक्रियेवर जे प्रमुख आरोप करण्यात येतात त्यामध्ये भांडवलशाहीला अनुकूल प्रक्रिया, शोषणावर आधारित प्रक्रिया, नववसाहतवादाचे साधन, लोकशाहीविरोधी प्रक्रिया, बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी निर्माण होते आदी आरोपांचा समावेश होतो.

❑❑❑